# तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय,

पत्रव्यवहाराचा पत्ता : ठाणे स्टेशन रोड, ठाणे (प.), तालुका व जिल्हा ठाणे, पिन कोड - ४०० ६०१.
दुरध्वनी क्र. ०२२ - २५३३११६४ ई-मेल : tahthane@gmail.com


क्र.महसुल/क-१/टे-२/जमीनबाब/कावि-८२/२०२०/१०९ दिनांक : २१.०१.२०२०

प्रति,
मा.आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

विषय : Destruction of mangroves by dumping of debris and reclamation at kharegaon, kalwa.

संदर्भ : १.) कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती यांचेकडील तक्रार क्र.८२
२.) प्रदुषण नियंत्रण अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडील पत्र क्र.ठामपा/प्रनिक/६७७/१९-२०, दि.०९/१२/२०१९

मा.सदस्य सचिव यांनी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.२०.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये सदर तक्रारीच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना पुन्हा स्थळपाहणी करुन संयुक्त पाहणी करण्यास सांगितले आहे. त्याअनुषंगाने दिनांक २०.१२.२०१९ रोजी अर्जदार यांचे समवेत संयुक्त स्थळपाहणी करणेत आलेली आहे.

सदर स्थळपाहणीकरीता खालीलप्रमाणे अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

१.) निवासी नायब तहसीलदार, ठाणे, २.) सहाय्यक बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, ३.) वनपाल, ठाणे, ४.) कळवा प्रभाग समितीचे कर्मचारी, ५.) मंडळ अधिकारी मुंब्रा व तलाठी साझा मुंब्रा, कळवा, दिवा हे उपस्थित होते.

सदर स्थळपाहणीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी मुंब्रा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.४४०/२०१९, दि.२०/१२/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

"मौजे खारेगाव येथील स.नं.५९/९ ही जागा आज रोजी पाटबंधारे विभाग यांच्या ताब्यात असुन सदर जागी २०००.०० चौ.मी.मध्ये भरावाखाली डेब्रिज टाकुन दिले असल्याचे आढळुन आले. तसेच सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्रालगत ५० मीटरच्या आत असल्याचे दिसुन येत आहे. मात्र आज रोजी कांदळवनाची तोड केल्याचे दिसुन येत नाही. सदरची जागा ही पाटबंधारे विभागाची असुन स्थानिक नागरीकांनी सदर जागेत कच्च्या पत्र्यांचे शेडमध्ये भंगाराची दुकाने सुरु केली असल्याचे दिसुन आले."

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अति.क्र.२००३/प्र.क्र.१८०/झोपा-२/ गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२, दि.१९/०२/२००३ तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जमिन-३/२००९/प्र.क्र.३७४/ज-१, दि.१०/१०/२०१३ रोजीच्या शासन राजपत्रानुसार जमिनधारकांनी त्यांच्या जागेचे संरक्षण हि त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. तसेच महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक जमिन ०३/२००९/प्र.क्र.१३/ज-१,

दि.०७/०९/२०१० नुसार शासकीय जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे ही सदर जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची जबाबदारी आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींप्रमाणे "नियोजन प्राधिकारी" म्हणुन शासकीय भुखंडावरील बांधकामास परवानगी देणे, अनधिकृत बांधकामावर सनियंत्रण ठेवणे ही मुलत: जबाबदारी महानगरपालिकेचीच आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील शासकीय तसेच खाजगी भूखंडावरील अनधिकृत बांधकामे, विनापरवानगी वापर किंवा विनापरवानगी वापरात बदल यावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेकामी संबंधित विभाग कार्यालयातील प्रभाग अधिकारी यांची "पदनिर्देशित अधिकारी" म्हणुन नियुक्ती केलेली आहे व त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३, ५४, ५५ व ५६ चे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचे अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम ठाणे महानगरपालिका यांचेमार्फत निष्कासित होणे आवश्यक आहे.

तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.२९५२/२०१२ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २२/०२/२०१३ रोजी पुढीलप्रमाणे निर्णय दिलेले आहेत.

" The collector is the owner of the plot where the encroachment has been reported does not mean that the corporation is extricated from its responsibility of the planning authority. ?Being the planning authority, the corporation alone is competent to initiate action under the provisions of the concerned enactment to undo the illegal constructions and encroachment. Indeed, the corporation can expect cooperation from the collector as well as the local police authorities but cannot absolve of the responsibility of taking action against such illegal construction, if any."

वरील सर्व कायदेशीर बाबींचा विचार करता जरी सदरचे बांधकाम सरकारी जागेवर असले तरी अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेची जबाबदारी स्थानिक नियोजन प्राधिकरण म्हणुन आपले विभागाची आहे.

तसेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत महापालिका घन कचरा नियम, २०१६ असुन त्यातील नियम ६ व केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल विभागाकडील अधिसूचना दि.२९.०३.२०१६ मधील नियम, १५ नुसार डेब्रिज बाबत महापालिकेमार्फत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी वरील बाबींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबतचा परिपूर्ण अहवाल मा.अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती यांचेकडे सादर करणेस विनंती आहे.

सही xxx
(अधिक पाटील)
तहसीलदार ठाणे

प्रत : मा.जिल्हाधिकारी, ठाणे (महसूल विभाग) यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

प्रत : मा.उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

प्रत : मा.उपवनसंरक्षक, ठाणे

२/- मौजे खारेगाव येथील स.नं.५९/९ ही जागा आज रोजी पाटबंधारे विभाग यांच्या ताब्यात असुन सदर जागी २०००.०० चौ.मी.मध्ये भरावाखाली डेब्रिज टाकुन दिले असल्याचे आढळुन आले. तसेच सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्रालगत ५० मीटरच्या आत असल्याचे दिसुन येत आहे. तरी सदर जागेत कांदळवनाचे नुकसान झाले आहे अगर कसे याबाबत आपलेमार्फत स्थळपाहणी होऊन अभिप्राय मिळणेस विनंती आहे.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 252
दिनांक 6/2/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

(अधिक पाटील)
तहसीलदार ठाणे